# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र.०७, दि. ०४.१०.२०२२

जा. क्र. ग.बॅ.स./सभा७/२०२२/ दिनांक – ०४.१०.२०२२

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०७**

**दिनांक – मंगळवार –दि. ०४.१०.२०२२**

**वेळ – दुपारी ०२.०० वाजता**

**स्थळ – कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची सहावी सभा **मंगळवार दि. ०४.१०.२०२२ रोजी दु. ०२.०० वाजता** मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब – चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**विषय-पत्रिका**

| विषय | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| विषय क्र. १ | मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०६. दि. २५.०७.२०२२ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे. | |
| विषय क्र. २ | मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०६. दि. २५.०७.२०२२ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे. | |
| विषय क्र. ३ | महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती बाबत | |
| विषय क्र. ४ | शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई (FRA) यांच्या कडून मंजूर झालेल्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या फी बाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ५ | महाविद्यालयातील कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी विविध सादर केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे व निर्णय घेणे. | |
| विषय क्र. ६ | श्री. डी. बी. देवी यांच्या **additional increment** बाबत संस्थेकडून आलेल्या पत्राबाबत चर्चा करून निर्णय घेणे. | |
| विषय क्र. ७ | श्री. मनोहर कदम यांच्या निलंनाबाबत केलेले कार्यवाही बाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ८ | महाविद्यालयातील शिक्षक सेवकांनी पी.एचडी./एम.ई./एम.टेक शैक्षणिक अर्हता धारण केलेनंतरची पगारवाढी बाबत केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ९ | महाविद्यालयातील एकूण २५ कायम शिक्षकेत्तर सेवक औद्योगिक न्यायालय यांचे कडे दाद मागणेसाठी गेलेले आहेत याबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १० | सेवानिवृत्त झालेले कायम शिक्षकेत्तर सेवकांनी नियमानुसार वेतनआयोग, महागाई भत्ता,ग्राच्युईटी, १२ व २४ वर्ष पूर्ण केल्यानंतर | |

| | | |
|---|---|---|
| | कालबद्ध पदोन्नती व इतर भत्ते फरक मिळणेबाबत केलेल्या अनेक अर्जाबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ११ | कॉम्प्युटर विभागातील नवनियुक्त ADHOC शिक्षक सेवकांच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी पगाराबाबत मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १२ | शिक्षकेत्तर सेवकांच्या किरकोळ रजा (CL) ०८ वरून १२ करणे व शिक्षक सेवकांचे अर्जित रजा (EL) बाबत चर्चा करणे व निर्णय घेणे. | |
| विषय क्र. १३ | सकाळ समूहाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या **Educon at Australia** मध्ये सहभाग होणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ मधून परत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांची सलंग्नता घेणे बाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १५ | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.** | |
| विषय क्र. १५.०१ | महाविद्यालयातील विविध विभागातील कामकाजाकरिता टेन्डर मागविली आहेत त्याची माहिती देणे व चर्चा करणे. | |
| विषय क्र. १५.०२. | महाविद्यालयासाठी खालील बाबी खरेदी करणेसाठी मंजुरी घेणे. १.कॅमेरा २. **Portable PA System** ३.**College Prospect,** ४. **College Magazin** ५. **NBA related** प्रिंटींग | |
| विषय क्र. १५.०३. | नवीन लिफ्ट साठी येणा-या जादा खर्चास मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १५.०४ | महाविद्यालयातील प्रत्येक विभागातील विद्यार्थांच्या प्रोजेक्ट व संशोधन करणे करिता येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १५.०५ | महाविद्यालयातील IT INFRASTURE & NETWORK UPDATION बाबत चर्चा करणे व खर्चास मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १५.०६ | महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांच्या फी सवलती बाबत चर्चा करून निर्णय घेणे. | |
| विषय क्र. १६ | महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया **FC Center** (सुविधा केंद्र) बाबत माहिती देणे . | |
| विषय क्र. १७ | मा. चेअरमन याचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे. | |
| विषय क्र. १७.१ | शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मधील हंगामी शिक्षकांना नियुक्ती आदेश संपलेनंतर केलेल्या कामाचे मानधन अदा करणेस सभेची मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १७.२ | महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख यांनी विद्यापीठ परिनियमातर्गत कामकाज होणेबाबत देलेल्या अर्जाबाबत. | |
| विषय क्र. १७.३ | टेरेसवरील प्रस्तावित बहुदेशिय सभागृह व महाविद्यालय परिसरातील लिफ्ट बसविणे बाबत चर्चा करणे. | |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

| | | |
|---|---|---|
| विषय क्र. १७.४ | महाविद्यालयातील M.E. या अभ्यासक्रमाची संपादणूक रद्द केल्याने उर्वरित फी माफीबाबत केलेल्या अर्जावर चर्चा करणे. | |
| विषय क्र. १७.५ | महाविद्यालयामध्ये रिक्त असलेले TPO या पदावर नवीन सेवकाची नियुक्ती करणेबाबत चर्चा करून पगारास मंजुरी घेणे. | |

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

प्रति- सर्व सन्माननिय नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सदस्य
सोबत १. विषयावरील टाचण, २. मागील सभेचा इतिवृत्तांत

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०७. दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत

जा. क्र. ग. बॉ. स. /सभा७/२०२२/ दिनांक – ०४.१०.२०२२

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)**
**सभा क्र - ०७**
**दिनांक - ०४.१०.२०२२**
**वेळ - दुपारी ०२.०० वाजता**
**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सातारा या महाविद्यालयाची नियामक मंडळाची (गर्व्हनिंग बॉडी) सातवी सभा दि. ०४.१०.२०२२ रोजी दुपारी ०२.०० वाजता कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा येथे मा. दिलीप वळसे पाटील, चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी संपन्न झाली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य –**

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब | चेअरमन |
| २. | मा. डॉ. अनिल पाटील साहेब<br>चेअरमन – रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ३. | मा. सचिव साहेब<br>रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ४. | मा. सहसचिव (उ. शि)<br>रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ५. | मा. प्रतापराव पवार | सदस्य |
| ६. | मा. डॉ. एन. बी. पासलकर | सदस्य |
| ७. | प्रा. डॉ. एस. एल. नलबलवार | सदस्य |
| ८. | डॉ. एस. व्ही. माने | सदस्य |
| ९. | प्रि. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य सचिव |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०७. दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत

नियामक मंडळाचे इतर सर्व सदस्य यांनी त्यांच्या काही अपरिहार्य व पूर्वनियोजित कारणास्तव सभेस उपस्थित राहता येत नाही. असे कळविल्यानुसार त्यांची सभेच्या अनुपस्थितिची रजा मंजूर करण्यात आली.

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणी मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्र. १. मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०६. दि. २५.०७.२०२२ चा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र. ०१.** :- मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०६, दिनांक २५.०७.२०२२ रोजीचा इतिवृत्तांत सोबत आपल्या अवलोकनार्थ जोडला आहे. सदर इतिवृत्तांचे अवलोकन केले. तसेच त्यास मंजुरी देण्यात आली.

**सूचक -: डॉ .ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा. दिलीप वळसे-पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. २ :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०६., दि. २५.०७.२०२२ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.**

**ठराव क्र. २.** :- मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०६., दि. २५.७.२०२२ मध्ये घेणेत आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| ठराव क्र.०१. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) इतिवृत्तांत वाचून कायम करणे तसेच निर्णयावरील कार्यवाहीची सभेने नोंद घेतली. | नोंद घेण्यात आली. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०७. दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र. ०२. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्रं.०६ दि.२५.०७.२०२२ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे. | नोंद घेण्यात आली. |
| ठराव क्र.०३. | महाविद्यालयामधील सेवकांनी दिलेल्या निवेदनाबाबात चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली व समिती गठीत करण्यात आली. |
| ठराव क्र.०४. | महाविद्यालयामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) स्थापन करणेबाबत चर्चा करणे. | याबाबत नोंद घेऊन चर्चा करण्यात आली |
| ठराव क्र.०५. | महाविद्यालयामधील वेगवेगळ्या पदावर काम करत असलेल्या शिक्षकांचा त्या पदाचा कालावधी पूर्ण झालेने नवीन शिक्षकांच्या नियुक्ती बाबत चर्चा करणे. **Dean Academics** प्रा. ए. बी. देगावकर यांनी दिलेल्या राजिनाम्या बाबत चर्चा करणे | नोंद घेण्यात आली असून. सदर पदावर नवीन शिक्षकाची नियुक्ती करण्यात आली. |
| ठराव क्र.०६. | महाविद्यालयातील प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडणेसाठी **Dean Administration** या पदाची तरतूद करून त्या पदावर प्राध्यापक नियुक्ती बाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली असून. सदर पदावर शिक्षकाची नियुक्ती करण्यात आली. |
| ठराव क्र..0७ | प्राध्यापक डॉ. डी. एस. आलदर यांनी प्राचार्य व रयत शिक्षण संस्था यांना केलेल्या विविध पत्रव्यवहाराबाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली व समिती गठीत करण्यात आली. |
| ठराव क्र.०८ | **DBATU** च्या नवीन **Statutes** नुसार प्राध्यापकांना कार्यभार देणे व प्राध्यापकांना **Research Activities** वाढविणेसाठी **Target** देणेबाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली व कार्यवाही करणेत आली. |
| ठराव क्र.०९ | माहाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक श्री. सी. व्ही. सावळे यांचे अर्जित रजारोखीकरण प्रस्तावावर चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली व मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहे. |
| ठराव क्र.१० | प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेमध्ये असणाऱ्या Institute Seats Surrender करणेबाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली. |
| ठराव क्र.११ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी आवश्यक असणाऱ्या AD-HOC शिक्षकांच्या नेमणूका व त्यांच्या वेतनास मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली व मंजुरी देण्यात आली. |
| ठराव क्र.१२ | महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील प्लेसमेंट बाबत सभेस माहिती देणे. | नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र.१३ | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबींविषयी मंजुरी घेणे.** | - |
| ठराव क्र.१३.०१ | महाविद्यालयामध्ये घेणेत येत असलेल्या NEET परीक्षेसाठी नविन नियमानुसार सर्व वर्ग खोल्यामध्ये पूर्व परवानगी घेऊन बसवलेल्या CCTV च्या खर्चास मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली व मंजुरी दिली. |
| ठराव क्र.१३.०२ | महाविद्यालयातील कार्यालयामध्ये इलेक्ट्रिक बॅकअप सेवा उपलब्ध करणेसाठी बॅटरी खरेदी करणेस मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली व मंजुरी दिली. |
| ठराव क्र.१३.०३ | Ion**CUDOS Software** खरेदी करणेबाबत चर्चा करणे | नोंद घेण्यात आली **Rwork IIM** हे **Software** खरेदी करणेस मंजुरी दिली. |
| ठराव क्र.१३.०४ | कॉम्प्युटर, सिव्हील व मेकॅनिकल विभागामध्ये **Lab Development** साठी नवीन कॉम्प्युटर व इतर बाबी खरेदीस मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली व मंजुरी दिली. |
| ठराव क्र.१३.०५ | कॉम्प्युटर विभागाचे नूतनीकरण करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. टप्याटप्याने नूतनीकरण करण्यास मंजुरी दिली |
| ठराव क्र.१३.०६ | महाविद्यालयातील **Auditorium** अद्यावत करणेसाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. टप्याटप्याने नूतनीकरण करण्यास मंजुरी दिली |
| ठराव क्र.१३.०७ | सिव्हील विभागामध्ये **Transportation Lab** व विभागप्रमुख दालन अद्यावत करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली व लोकवर्गणीतून खर्च करण्यास मंजुरी दिली. |
| ठराव क्र.१४ | महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांच्या १२ वर्ष कालबध्द पदोन्नती संदर्भात रयत शिक्षण संस्थेकडून आलेल्या पत्राबाबत | नोंद घेण्यात आली व मंजुरी दिली. |
| ठराव क्र.१५ | मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे | नोंद घेण्यात आली तसेच कार्यवाही पूर्ण झाली व मंजुरी देण्यात आली. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

त्यानुसार मागील नियामक मंडळ सभा क्र. ०६ दि. २५.०७.२०२२ रोजीचा इतिवृत्तांत मंजूर करणेत आला व कार्यवाहीची नोंद घेणेत आली.

**सूचक -: मा. दिलीप वळसे-पाटील**
**अनुमोदक -: प्रा. डॉ .एन. बी .पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. ३. :- महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती बाबत...**

**ठराव क्र. ३** :- डॉ. बाबासाहेब आंबडेकर तंत्रशिक्षण विद्यापीठ लोणेरे, रायगड यांची कायम संलग्नता घेतली.

**AICTE-SPICES Club** साठी AICTE कडून १ लाख रुपये **fund sponsor** झाले आहेत. या activity साठी Co-ordinator डॉ. शबिना मोदी, व प्रा. सौ. शेख तरून्म मॅडम होत्या.

- **Adhoc faculty** करिता दिनांक ०७रोजी २०२२/०७/ मुलाखती घेण्यात आल्या मुलाखती मध्ये ३० **faculty** ची निवड केली त्यापैकी २३ **faculty** कामावर रुजू झाल्या आहेत.
- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता नव्याने (**FC**) सुविधा केंद्र करिता अर्ज केला महाविद्यालयास **Facility Center** (**FC**) सुविधा केंद्र मंजूर झाले आहे.
- **AICTE IIC (Institute Innovation Cell)** ची स्थापना केली आहे. या activity साठी Co-ordinator हे डॉ. तपासे आहेत.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील सेवकांनी दिलेल्या निवेदनाबाबत सभेने नोंद घेतली व मार्गदर्शन केले. सभेने मंजुरी दिली

**सूचक -: मा. दिलीप वळसे-पाटील**
**अनुमोदक -: मा. डॉ. अनिल पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०७. दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत*

**विषय क्र. ४ :- शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई (FRA) यांच्या कडून मंजूर झालेल्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या फी बाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र.४** :- शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ साठी शिक्षण नियामक प्राधिकरण मुंबई (FRA) यांनी महाविद्यालयाची फी रुपये १,११,२७५/- मंजूर केलेली आहे. ही फी आर्थिक वर्ष २०२० - २१ मध्ये झालेल्या खर्चावर मंजूर केलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ ची फी ही शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ पेक्षा कमी झाली असल्याचे दिसून येते. ही फी कमी होण्याचे प्रमुख कारणे महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस सांगितले. सभेने त्याची नोंद घेतली. तसेच सातारा, सांगली, कोल्हापूर इ. जिल्ह्यातील इतर महाविद्यालयाची FRA कडून मंजूर झालेल्या फी चा उहापोह करणेत आला. त्यावरून आपल्या महाविद्यालयासाठी मंजूर झालेल्या फी बद्दल सभेने समाधान व्यक्त केले. शैक्षणक वर्ष २०२२-२३ साठी झालेला खर्च विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी फी वाढीचा प्रस्ताव न देता हीच फी लागू करावी असे ठरले. त्याचबरोबर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी फी वाढीचा प्रस्ताव करणेसाठी खालील बाबी सभेने लागू करणेस सांगितले आहेत.

१. **पगारावरील खर्च वाढविणेसाठी सध्या लागू असलेला ११९ % महागाई भत्त्यामध्ये माहे ०१ ऑक्टोबर २०२२ पासून ०५ % वाढ करून तो एकूण १२४% करणेस मंजुरी दिली.**

२. **FRA शुल्क नियामक मंडळ मध्ये ग्राह्य धरणेत येत असणाऱ्या पगाराव्यतिरिक्त बाबींवर १०० ते १२५ लक्ष रु. खर्च करणेचे ठरले. त्यामध्ये विद्यार्थी प्रशिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, सर्व प्रकल्प, प्रयोग शाळा साहित्य तसेच इमारत नूतनीकरण इ. बाबीवर गरजेनुसार खर्च करणेचे ठरले.**

वरील दोन्ही बाबींच्या वर सविस्तर चर्चा करून मंजुरी दिली.

**सूचक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक -: मा. प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०७. दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत*

**विषय क्र. ५ :- महाविद्यालयातील कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी विविध सादर केलेल्या अर्जावर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ५ :** महाविद्यालयातील कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी खालील अर्ज केलेले आहेत त्याबद्दल मार्गदर्शन मिळावे.

- स्थानिक व्यवस्थापन समितीचे गठन करणेबाबात
- महागाई भत्त्याची अंमलबजावणी होणेबाबत
- शासन नियमानुसार महागाई भत्ता मिळणेबाबत

वरील सर्व अर्जाबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यानी सभेस माहिती दिली व याबाबत सभेने चर्चा करून शिखर संस्थांचे मार्गदर्शन घेणेस सुचविले आहे.

**सूचक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक -: मा. दिलीप वळसे पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. ६ :- श्री. डी. बी. देवी यांच्या Additional Increment बाबत संस्थेकडून आलेल्या पत्राबाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ०६ :-** श्री. डी. बी. देवी यांनी M. Tech पदवी २०११ मध्ये प्राप्त केली. त्यानुसार त्यांनी Additional Increment बाबत अर्ज केलेला होता. सदरचा अर्ज संस्थेकडे पाठवला असता त्यांनी Additional Increment देणेबाबत महाविद्यालयाच्या नियामक मंडळच्या पुढे ठेऊन कार्यवाही करण्यात यावी असे कळविले आहे.

उपरोक्त नुसार श्री. डी. बी. देवी यांच्या Additional Increment बाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यानी सभेस माहिती दिली व याबाबत सभेने चर्चा करून शिखर संस्थांचे मार्गदर्शन घेणेस सुचविले आहे.

**सूचक -: मा. डॉ. अनिल पाटील साहेब**
**अनुमोदक -: मा. दिलीप वळसे-पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय ★ सातारा ★

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०७. दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत*

**विषय क्र. ७ :- श्री. मनोहर कदम यांच्या निलंनाबाबत केलेले कार्यवाही बाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ७ :-** श्री. मनोहर कदम यांचे मा. सचिवसो यांच्याकडील दि. २८.११.२०१९ च्या पत्रानुसार दि. २९.११.२०१९ पासून निलंबन करण्यात आले होते. त्यासाठी संस्थेने चौकशी समिती नेमलेली होती. चौकशी समितीचे कामकाज सुरु आहे. सदर समितीने आजपर्यंत ४ चौकशी समिती सभा घेतलेल्या आहेत. परंतु श्री. मनोहर कदम यांनी २५.०८.२०२२ रोजी प्राणांतिक उपोषण केले. त्यांनी हे उपोषण मा. सहसचिव (उ. शि.) रयत शिक्षण संस्था यांच्या सूचनेनुसार सदर दिवशी संध्याकाळी ७ वाजता उपोषण मागे घेतले. तसेच संस्था कार्यालयात दि. २७.०८.२०२२ रोजी झालेल्या चर्चेनुसार दि ०१.०९.२०२२ रोजीच्या मा. साचिवसो रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्याकडील पत्रानुसार श्री. मनोहर कदम यांना दि. ०१.०९.२०२२ रोजी पासून निलंबन उठविण्यात आले व महाविद्यालयामध्ये नियमित हजर करून घेण्यात आलेले आहे.

उपरोक्त माहिती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस दिली. याबाबत सभेने तीव्र नाराजी व्यक्त केली. श्री. कदम एम. व्ही. यांची चौकशी युद्ध पातळीवर पूर्ण करावी व येणाऱ्या पुढील महिन्यामध्ये चौकशी संपवून योग्य तो निर्णय घेणेत यावा असे सभेने सूचित केले.

**सूचक -: मा. दिलीप वळसे-पाटील**
**अनुमोदक -: प्रि. डॉ. विठ्ठल शिवणकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. ८ :- महाविद्यालयातील शिक्षक सेवकांनी पी.एचडी./एम.ई./एम.टेक शैक्षणिक अर्हता धारण केलेनंतरची पगारवाढी बाबत केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ८ :-** महाविद्यालयातील ११ शिक्षक सेवकांनी पी.एचडी./एम.ई./एम.टेक शैक्षणिक अर्हता धारण केलेबद्दल Additional Increment ची मागणी केलेली आहे.

वरील विषयासंदर्भात विद्यापीठ / DTE / AICTE या शिखर संस्थांचे मार्गदर्शन घेणे आवशक वाटते. तसेच आशा पद्धतीच्या Additional Increment या DBATU / शासकीय महाविद्यालयामध्ये देण्यात आलेल्या आहेत का? याबाबत माहिती घेऊन Additional Increment देण्याबाबत निर्णय घेणेत यावा. अशी माहिती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस दिली याबाबत सभेने सहाय्यक प्राध्यापक पदावर काम करत असलेल्या व पीएच.डी संपादन केलेल्या सहाय्यक प्राध्यापकांना पीएच.डी. Additional Increment देणेबाबत DBATU विद्यापीठाशी चर्चा करून नियमानुसार निर्णय घेणेत यावा असे ठरले.

**सूचक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक -: मा. प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०७, दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत

**विषय क्र. ९ :- महाविद्यालयातील एकूण २५ कायम शिक्षकेत्तर सेवक औद्योगिक न्यायालय यांचे कडे दाद मागणेसाठी गेलेले आहेत याबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ९ :-** महाविद्यालयातील एकूण २५ कायम शिक्षकेत्तर सेवक हे औद्योगिक न्यायालय यांचे कडे ७ वा वेतन आयोगानुसार वेतन मिळणेबाबत गेलेले आहेत. त्या सेवकांची नावे खालीलप्रमाणे...

| क्र. | सेवकाचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| ०१. | श्री. गाडे जयवंत मुगुटराव | शिपाई |
| ०२. | श्री. इंदलकर पाटील हणमंत जगन्नाथ | ग्रंथालय लिपिक |
| ०३. | श्री. दुधगांवकर सुरेंद्र सावता | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ०४. | श्री. गायकवाड दिनकर सिधू | शिपाई |
| ०५. | श्री. गुजर वसंत मोहनराव | शिपाई |
| ०६. | श्री. दराडे सतीश कालूसिंग | तांत्रिक सहाय्यक |
| ०७. | श्री. नळे प्रभाकर मधुकर | तांत्रिक सहाय्यक |
| ०८. | श्री. जगदाळे सुहास जयसिंगराव | तांत्रिक सहाय्यक |
| ०९. | श्री. निंबाळकर विजयकुमार शंकरराव | तांत्रिक सहाय्यक |
| १०. | श्री. भोसले संजीवन शिवाजीराव | तांत्रिक सहाय्यक |
| ११. | सौ. सय्यद अंजुम रज्जाक | कनिष्ट लिपिक |
| १२. | श्री. पाटोळे अशोक पांडुरंग | प्रयोगशाळा सहाय्यक |
| १३. | श्री. भिंगारदेवे बजरंग तुकाराम | शिपाई |
| १४. | श्री. देवरुखे धनंजय शंकर | शिपाई |
| १५. | श्री. काकडे संजय बाजीराव | शिपाई |
| १६. | श्री. सूर्यवंशी विजय मधुकर | इलेक्ट्रिकल लॅब सहाय्यक |
| १७. | श्री. दौंडे विजय गणपतराव | शिपाई |
| १८. | श्रीमती. निकम विद्या सुर्यकांत | कनिष्ट लिपिक |
| १९. | श्री. भोईटे दत्तात्रय मारुतीराव | कनिष्ट लिपिक |
| २०. | श्री. रणखांबे जालिंदर गणपती | शिपाई |
| २१. | श्री. गायकवाड राजाराम साहेबराव | शिपाई |
| २२. | श्री. नलवडे शशिकांत विठोबा | ग्रंथालय लिपिक |
| २३. | श्री. भोसले पोपट भगवान | डे-वॉचमन |
| २४. | श्री. भुरके संदीप बबनराव | शिपाई |
| २५. | श्री. गुडीले संजीव अप्पाराव | शिपाई |

उपरोक्त नुसार महाविद्यालयातील कायम शिक्षकेत्तर सेवक हे औद्योगिक न्यायालय, सातारा यांचे कडे ७ वा वेतन आयोगानुसार वेतन मिळणेबाबत गेलेले आहेत अशी माहिती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस दिली. व सभेने याबाबत नोंद घेतली

**सूचक -: मा. डॉ. अनिल पाटील साहेब**
**अनुमोदक -: प्रि. डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०७. दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत*

**विषय क्र. १० :- सेवानिवृत्त झालेले कायम शिक्षकेत्तर सेवकांनी नियमानुसार वेतनआयोग, महागाई भत्ता,ग्राच्युईटी, १२ व २४ वर्ष पूर्ण केल्यानंतर कालबद्ध पदोन्नती व इतर भत्ते फरक मिळणेबाबत केलेल्या अनेक अर्जाबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १० :-** सेवानिवृत्त झालेले कायम शिक्षकेत्तर सेवकांनी नियमानुसार वेतनआयोग, महागाई भत्ता, ग्राच्युईटी, १२ व २४ वर्ष पूर्ण केल्यानंतर कालबद्ध पदोन्नती व इतर भत्ते फरक मिळणेबाबत मा. सचिवसो रयत शिक्षण संस्था यांना अर्ज केलेले आहेत. त्याची प्रत प्राचार्य यांना पाठविण्यात आलेली आहे. सदर अर्ज आपल्या माहितीसाठी सदर करत आहोत. सदर अर्जाची माहिती माहिती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस दिली. व सभेने याबाबत नोंद घेतली

**सूचक -: प्रि. डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
**अनुमोदक -: प्रि. डॉ. ए. सी. अत्तार**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. ११ :- कॉम्प्युटर विभागातील नवनियुक्त ADHOC शिक्षक सेवकांच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी पगाराबाबत मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. ११ :- अ)** शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ साठी कॉम्पुटर विभागामध्ये निवड केलेल्या ३ प्रध्यापक हे महाविद्यालयामध्ये हजर झालेले नाहीत. त्यांच्या जागी खालील २ उमेदवारांची रीतसर मुलाखती घेउन निवड करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| नाव | शिक्षण | अनुभव | Salary + PF |
|---|---|---|---|
| प्रा. उमा भोकरे | M.Tech (Comp) | १३ वर्षे | ४५००० + १८०० |
| प्रा. क्षीरसागर अनिरुद्ध | M.Tech (Comp) PhD pursuing (At the verge of completion) | १२ वर्षे + १ वर्ष (Industry) | ५०००० + १८०० |

**ब)** शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ साठी कॉम्पुटर विभागामध्ये निवड केलेल्या ०३ प्रध्यापकांनी पगार वाढीसंदार्भामध्ये अर्ज केलेले आहेत. या प्राध्यापकांना मागील शैक्षणीक वर्षी देत असलेल्या पगाराच्या २०% पगारवाढ देण्यात आली आहे.

उपरोक्त नुसार मुद्दा क्र. अ. मध्ये नमूद केलेनुसार महाविद्यालयातील संगणक या विभागासाठी शिक्षक सेवकांची महाविद्यालयाच्या स्तरावर समिती गठीत करून रीतसर मुलाखती द्वारे दोन शिक्षक सेवकांची निवड करणेत आलेली आहे. व सदर सेवकांना देणेत येणारा पगार हा समिती ने ठरविल्यानुसार देण्याचे महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. तरी याबाबत सभेने चर्चा करून सदर सेवकांचा अनुभव बघता व इतर कामकाज बघता वरील तक्त्यानुसार दरमहा पगार व पी.एफ. देण्यास मंजुरी दिली.

**सूचक -: प्रि. डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

**विषय क्र. १२.** :- शिक्षकेत्तर सेवकांच्या किरकोळ रजा (CL) ०८ वरून १२ करणेबाबत व शिक्षक सेवकांचे अर्जित रजा (EL) बाबत चर्चा करणे व निर्णय घेणे.

**ठराव क्र. १२** :- शिक्षकेत्तर सेवकांच्या किरकोळ रजा (CL) ०८ वरून १२ करणेसंदर्भात अर्ज प्राप्त झाला आहे. सदर अर्जाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ लोणेरे, यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी शिक्षकेत्तर सेवकांच्या किरकोळ रजा (CL) या Government Resolution (GR) नुसार ०८ च दिल्या जातात असे सांगितले. याबाबत सभेने मार्गदर्शन करावे.

तसेच शिक्षक सेवकांचे अर्जित रजा (EL) बाबत अर्ज प्राप्त झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ लोणेरे यांच्या Statutes नुसार १० रजा देणेबाबत नमूद केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ लोणेरे यांच्या नवीन Status नुसार शिक्षक सेवकांना अर्जित १० रजा (EL) देणेत याव्यात. याबाबत सभेने मार्गदर्शन करावे.

उपरोक्त नुसार महाविद्यालयातील कायम शिक्षक सेवकांना संलग्नित विद्यापीठाच्या Statutes नुसार १० अर्जित रजा देणेबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. सभेने याबाबत चर्चा करून नियमानुसार व Statutes नुसार १० रजा देणेस परवानगी दिली. तसेच महाविद्यालयातील कायम शिक्षकेत्तर सेवकांना किरकोळ रजा (CL) या Government Resolution (GR) नुसार ०८ च दिल्या जातात असे सभेने मार्गदर्शन केले .

**सूचक -: डॉ. एस. व्ही. माने**
**अनुमोदक -: मा. डॉ. अनिल पाटील साहेब**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. १३.** :- **सकाळ समूहाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या** Educon at Australia **मध्ये सहभाग होणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १३**:- सकाळ समूहाच्या वतीने दरवर्षी **Educon** या उपक्रमाचे आयोजन केले जाते. या उपक्रमाअंतर्गत विविध देशातील शैक्षणिक संस्थांशी सामंज्यस्य करार करून Faculty व Students Exchange Program राबवले जातात. या वर्षी Educon हे **Australia** या देशामध्ये भरविण्यात येणार आहे. याबद्दलचे पत्र सकाळ माध्यम समूहाकडून महाविद्यालयास प्राप्त झाले आहे. सदर पत्राबाबतची माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस दिली व **Educon** या उपक्रमासाठी Australia येथे उपस्थित राहणेसाठी मंजुरी देणेत आली आहे. तसेच Educon या उपक्रमासाठी Australia येथे उपस्थित राहण्यास एकूण ४,५०,०००/- (चार लाख पन्नास हजार रु. ) खर्च येणार असून सदर खर्चास सभेने मंजुरी दिलेली आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा



**सूचक** -: **मा. दिलीप वळसे पाटील**
**अनुमोदक** -: **मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. १४.** :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ मधून परत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांची सलंग्नता घेणे बाबत चर्चा करणे.

**ठराव क्र. १४:-** महाविद्यालय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी सलग्न आहे. परंतु विद्यापीठामध्ये असणाऱ्या अपुरया कर्मचारी वर्गामुळे विद्यापीठाकडून बर्याच गोष्टींचा निचरा वेळेमध्ये होताना दिसत नाही. उदा. विद्यार्थ्यांच्या परीक्षा, विद्यार्थ्यांचे निकाल, मार्कशीट, तोंडी परीक्षा, Faculty Approvals, Research Guideship इ बाबींमध्ये बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या सर्व बाबींचा विचार करून सभेने याबाबत मार्गदर्शन करावे. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने रयत विद्यापीठात समावेश करण्याचे सुचविले आहे.

**सूचक** -: **मा. डॉ. अनिल पाटील**
**अनुमोदक** -: **प्रा. डॉ. एस. एल. नलबलवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. १५ : महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.**

**विषय क्र. १५.०१ : महाविद्यालयातील विविध विभागातील कामकाजाकरिता टेन्डर मागविली आहेत त्याची माहिती देणे व चर्चा करणे.**

**ठराव क्र. १५.०१ :-** महाविद्यालयातील विविध विभागातील कामकाजाकरिता टेन्डर मागविली आहेत. त्यामध्ये १.कॅप जेमिनी सेंटर २. लिफ्ट ३. Water tank ४. Auditoriam

यासाठी निवेदांची संख्या कमी आलेली असल्यामुळे Tender ला मुदत वाढ देण्यात यावी. अशी माहिती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस दिली व सभेस चर्चा करून त्यास सभेने Tender मागविणेसाठी मुदतवाढ करणेस परवानगी दिली.

**विषय क्र. १५.०२ : महाविद्यालयासाठी खालील बाबी खरेदी करणेसाठी मंजुरी घेणे.**

१. कॅमेरा  २. Portable PA System  ३. College Prospect,
४.College Magazin  ५. NBA related प्रिंटींग

**ठराव क्र. १५.०२** :- महाविद्यालयामध्ये वरील बाबी खरेदी करावयाची आहेत. यासाठी अंदाजे २,५०,०००/- खर्च येणार आहे. याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली व सभेस चर्चा करून त्यास सभेने मजुरी दिली.

**विषय क्र. १५.०३ : नवीन लिफ्ट साठी येणा-या जादा खर्चास मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १५.०३** :- नियामक मंडळाच्या मागील सभेने महाविद्यालयामध्ये नवीन लिफ्ट बसविण्यास २० लाख रुपयास मंजुरी दिलेली आहे. परंतु लिफ्ट साठी Steel Frame करणे आवश्यक आहे त्यासाठी जाद्याचा ०८ लाख इतका खर्च येणार आहे. त्यास सभेने मंजुरी दिली.

**विषय क्र. १५.०४ : महाविद्यालयातील प्रत्येक विभागातील विद्यार्थांच्या प्रोजेक्ट व संशोधन करणे करिता येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १५.०४** :- महाविद्यालयातील प्रत्येक विभागामध्ये एखादा मोठा प्रोजेक्ट विद्यार्थ्यांच्याकडून करून घेतला जातो. तसेच इतर संसोधानदेखील सुरु असते तसेच प्रध्यापाकानाही वेगवेगळ्या Faculty Development Program साठी जाने आवश्यक असते. यासाठी येणारा खर्च हा शिक्षण शुल्क समितीस अपेक्षित असतो. तसेच विद्यापीठ सालाग्नीकरण, NBA, NAAC इ बाबीसाठी हा खर्च करणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागासाठी अंदाजे ०८ लाख रुपये असे एकून ५ विभागाचे मिळून ४० लाख रुपये खर्चास येणार आहे, अशी विनंती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यानी सभेस केली. त्यास सभेने मंजुरी दिली.

**विषय क्र. १५.०५ : महाविद्यालयातील IT INFRASTURE & NETWORK UPDATION बाबत चर्चा करणे व खर्चास मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १५.०५** :- महाविद्यालयातील IT INFRASTURE & NETWORK हे जुन्या पद्धतीचे आहे. त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. या सुधारणा केल्यामुळे network चे स्पीड वाढणार आहे व network connectivity मध्ये सातत्य राहणार आहे. ही IT INFRA सुधारणा करण्यासाठी अंदाजे ३.५ लाख रुपये खर्च येणार आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस दिली व सभेस चर्चा करून अंदाजे ३.५ लाख रुपये खर्च करणेस परवानगी दिली.

**विषय क्र. १५.०६ : महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांच्या फी सवलती बाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

**ठराव क्र. १५.०६ :-** या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेश घेतलेल्या कु. मंगेश सुरेश दुर्गावळे (FY E &TC) व कु. आशितोष राजेंद्र शिंदे (SY Electronics) या विद्यार्थ्यांची आर्थिक परीस्थिती बेताची असल्याने सदर विद्यार्थ्यांना कर्मवीर शिष्यवृत्ती मिळणेबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस विनंती केली. त्यानुसार सभेने प्रत्येकी ३००००/- शिष्यवृत्ती देणेबाबत सूचना दिली. त्यानुसार सदर दोन विद्यार्थ्यांना कर्मवीर शिष्यवृत्ती देण्यास मंजुरी दिली.

**सूचक** -: **मा. डॉ. अनिल पाटील साहेब**
**अनुमोदक** -: **प्रिं.डॉ. विठ्ठल शिवणकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. १६ :- महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया** FC Center **(सुविधा केंद्र) बाबत माहिती देणे** .

**ठराव क्र. १६ :-** महाविद्यालय प्रथम वर्ष प्रवेश (B.Tech) तसेच Direct Second Year प्रक्रियेसाठी FC Center हे दि. २१.०९ .२०२२ पासून सुरु करण्यात आले आहे. आजपर्यंत १००४ विद्यार्थांचे application form confirm करण्यात आले आहेत. तसेच M. Tech साठी स्वतंत्र FC Center २७.०९.२०२२ पासून सुरु करण्यात आले आहे.

**सूचक** -: **प्रि. डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक** -: **प्रि. डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. १७ : मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे**

**विषय क्र. १७.०१ : शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मधील हंगामी शिक्षकांना नियुक्ती आदेश संपलेनंतर केलेल्या कामाचे मानधन अदा करणेस सभेची मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १७.०१ :-** शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मधील हंगामी शिक्षकांना नियुक्ती आदेश जुलै २०२२ मध्ये संपले आहेत. परंतु माहे ऑगस्ट २०२२ व सप्टेंबर २०२२ मध्ये विद्यापीठ परीक्षेचे कामकाज, प्रवेश प्रक्रिया २०२२-२३, **NBA** चे कामकाज इ. कामकाज हंगामी शिक्षकांनी केले आहे. त्यांचे मानधन अदा करणेस सभेने मंजुरी द्यावी. सभेने नोंद घेऊन हंगामी शिक्षकांना मानधन अदा करणेस मंजुरी दिली.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०७. दि. ०४.१०.२०२२ इतिवृत्तांत*

**हंगामी (ADHOC) शिक्षक सेवकांनी केलेला कामाचा तपशील खालील प्रमाणे-**

| अ, क्र. | महिना | एकूण रक्कम |
|---|---|---|
| ०१. | एप्रिल २०२२ ते जुलै २०२२ | ७६,६००/- |
| ०२. | ऑगस्ट २०२२ | २,६६,४७६/- |
| ०३. | सप्टेंबर २०२२ | २,३५,९९१/- |
| ०४. | ऑक्टोबर २०२२ | ३४,३१८/- |
| **एकूण रक्कम** | | ६,१३,३८५/- |

**विषय क्र. १७.०२ : महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख यांनी विद्यापीठ परिनियमातर्गत कामकाज होणेबाबत देलेल्या अर्जाबाबत.**

**ठराव क्र. १७.०२ :-** वरील विषयाबाबत सभेने नियमानुसार व विद्यापीठ परिनियमातर्गत कामकाज करणेबात सूचित केले आहे.

**विषय क्र. १७.०३ : टेरेसवरील प्रस्तावित बहुदेशिय सभागृह व महाविद्यालय परिसरातील लिफ्ट बसविणे बाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १७.०३ :-** उपरोक्त नुसार टेरेसवरील प्रस्तावित बहुदेशिय सभागृह व महाविद्यालय परिसरातील लिफ्ट बसविणे बाबत सिव्हील विभागप्रमुख यांनी अर्ज सादर केलेला आहे. याबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी महाविद्यालयाच्या टेरेस वर असणारे दहा हजार चौरस फुटाचे शेड हे FSI मध्ये नसल्याने त्यास सातारा नगरपालिका सातारा यांची परवानगी घेणेत आलेली नाही. तसेच हा FSI नगरपालिकेकडून विकत घ्यावा लागणार आहे. त्यास अंदाजे ३० ते ३५ लाख रु. एवढा खर्च अपेक्षित आहे. याव्यतिरिक्त शेडचे नूतनीकरण करण्यास अजून अंदाजे ३५ ते ४० लाख रु. येऊ शकतो. महाविद्यालयाच्या टेरेस वरील असणा-या शेडचे नूतनीकरण व त्यास येणाऱ्या खर्चाबाबतचा सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने टेरेसवरील प्रस्तावित बहुदेशिय सभागृहाच्या कामकाजास चर्चा करून स्थगित ठेवणे बाबतचा निर्णय दिला आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

**विषय क्र. १७.०४: महाविद्यालयातील M.E. या अभ्यासक्रमाची संपादणूक रद्द केल्याने उर्वरित फी माफीबाबत केलेल्या अर्जावर चर्चा करणे.**

**ठराव क्र. १७.०४ :-** उपरोक्त नुसार श्री. सचिन दगडू हिरे सदर विद्यार्थ्याचे शिवाजी विद्यापीठाने एम. ई. अभ्यासक्रमाची संपादणूक (डी बार) रद्द केल्याने महाविद्यालयातील उर्वरीत फी माफ करून शैक्षणिक कागदपत्रे परत मिळणेबाबत महाविद्यालयात अर्ज सादर केलेला आहे. सदर विषय महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सेभेस माहिती दिली. त्यास सभेने श्री. सचिन दगडू हिरे यांची उर्वरित असलेली फी माफ करण्याचे सुचविले व कागदपत्र देण्यास परवानगी दिली.

**विषय क्र. १७.०५ : महाविद्यालयामध्ये रिक्त असलेले TPO या पदावर नवीन सेवकाची नियुक्ती करणेबाबत चर्चा करून पगारास मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १७.०५ -** महाविद्यालयामध्ये TPO हे पद रिक्त असून सदर TPO पदाची नियुक्ती करणेसाठी रीतसर जाहिरात देणेत आली होती परंतु TPO पदासाठी एकही पात्र उमेदवार नसल्याने सदरची जागा रिक्त राहिली. तदनंतर महाविद्यालयात TPO या पदा साठी आलेल्या अर्जांची तपासणी व मुलाखत घेणेसाठी महाविद्यालयात खालील समिती गठीत करणेत आली.

| अ. क्र. | समितीचे नाव | पद |
|---|---|---|
| ०१. | मा. डॉ .एन. बी. पासलकर | चेअरमन |
| ०२. | डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य |
| ०३. | डॉ. करीम शेख | सदस्य |
| ०४. | डॉ. सौ. एस. जे. मोदी | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीने दि. ०४.१०.२०२२ रोजी आलेल्या अर्जांची तपासणी करून रीतसर मुलाखती घेतल्या. सदर मुलाखती मधून पात्र व अनुभव असलेले श्री. पाटील संजीव विठ्ठल या उमेदवाराची निवड करणेत आलेली आहे. मुलाखती मधून निवड केलेल्या उमेदवाराचा एकूण १० वर्षांचा अनुभव

विचारात घेऊन श्री. पाटील संजीव विठ्ठल यांना दरमहा ६५,००० + १८०० PF असे वेतन अ करणेस समितीने सुचवले आहे. त्यानुसार महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी निवड केलेल उमेदवाराची माहिती सभेस दिली. त्याबाबत सभेने चर्चा करून नवीन TPO या पदावर निवड केलेल उमेदवाराची नियुक्ती करणेस मंजुरी दिली.

**सूचक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक -: मा. प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

**प्राचार्य तथा सचिव**
**नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी)**
**कर्मवीर भाऊराव पाटील**
**कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,सातारा.**

**चेअरमन**
**नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी)**
**कर्मवीर भाऊराव पाटील**
**कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,सातारा.**